Vol 6 Issue 12 Jan 2017

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 4.1625(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 12 | JANUARY - 2017

# मराठे व सिद्दी यांच्यातील संबंधाचा अभ्यास

श्री सतेश बलभीम कदम



सार ः

प्रस्तुत शोध निबंधामध्ये मध्ययुगीन काळातील मराठे आणि सिद्दी यांच्यातील संबंधाचा आढावा घेण्यात आला आहे . मध्ययुगीन काळामध्ये व्यापाराच्या निमित्ताने भारतात आलेल्या ॲबिसीनियन सिद्दींनी आपल्या कुटील कारस्थानांनी अनुक्रमे निजामशाही,आदिलशाही व मोगल यांची कृपा संपादन केली होती . आपले स्वतंत्र राजकीय अस्तित्व निर्माण करण्यासाठी या सिद्दी लोकांनी इ . स . 1571 पासून पश्चिम किनायावरील जंजीरा हे राजकीय केंद्र निश्चत केले होते . त्यांनी हळूहळू कोकण किनारपट्टीच्या बयाच भूभागावर वर्चस्व प्रस्थापित केले आणि येथीलजनतेवर अनन्वीत अत्याचार सुरू केले होते . त्याचा परिणाम म्हणजे त्यांच्या शेजारील मराठा सत्तेने त्यांचे अस्तित्व संपवून टाकण्यासाठी इ . स . 1657 पासून इ . स . 1736 पर्यतच्या प्रदीर्घ कालखंडात सिद्दीविरूध्द अनेक मोहिमा उघडल्या होत्या . त्यातून मराठयांनी सिद्दींना फक्त जंजीरा किल्यापुरतेच मर्यादित ठेवले परंतु सिद्दींचा बिमोड करण्यात मराठयांना अपयश आले होते .

**Keywords** ः सिद्दी, मराठे , आरमार, संघर्ष

## प्रस्तावना ः

भारताला विस्तीर्ण असा समुद्रकिनारा लाभलेला आहे . त्यामुळे प्राचीन काळापासून समुद्रावरील व्यापार भरभराटीस आला होता . या व्यापाराची वर्णने अनेक भारतीय ग्रंथातून व परकीय प्रवाशांच्या प्रवासवर्णनातून येतात . भारताच्या पश्चिमेला समुद्रकिनारा सहयाद्री पर्वतामुळे वैशिष्टयपूर्ण बनलेला आहे . या पर्वतामुळे समुद्रकिनायालगत अनेक खाडयांची निर्मिती झालेली आहे,त्यामुळे जहाजंची ने आण करणे व जहाजे थांबविणे अतिशय सोयीचे आहे . या वैशिष्टयपूर्ण रचनेमुळे येथे अनेक बंदरांची निर्मिती करणे सोयीचे बनले . हा समुद्रकिनारा अरबस्तानकडे वाहत असल्यामुळे इराण,अरबस्तान, ॲबिसीनिया इत्यादी देशातील साहसी दर्यावर्दी मध्ययुगीन काळात या समुद्रकिनायावर येवून व्यापार करू लागले . पुढे युरोपातील पोर्तुगीज,डच,इंग्रज व फ्रेंच इत्यादी लोकही या समुद्रकिनायावरून मोठयाप्रमाणात व्यापार करू लागले . या सर्व गोष्टींमुळे कोकणवासीयांना नवनवीन संस्कृत्यांची व ज्ञान विज्ञानाची ओळख लवकरच झाली . समुद्रावरील या व्यापारावर नियंत्रण ठेवून त्यातून अर्थप्राप्ती करण्यासाठी ऐतदेशीय सत्तांनी सतत प्रयत्न केले . मध्ययुगीन काळातील त्या सत्ता अनुक्रमे बहमनी,विजयनगर,निजामशाही,मोगल व मराठे या होत्या . विदेशी व्यापारी समुद्रावरील व्यापाराच्या वर्चस्वावरून एकमेकांबरोबर सतत संघर्ष करीत होते . त्याचबरोबर त्यांना ऐतद्देशीय सत्तांबरोबरही अनेक कारणांमुळे संघर्ष करावा लागत होता . या व्यापायातील सिद्दी लोकांनी बहमणी प्रशासनात मोठमेठया हुद्यांच्या जागा मिळविल्या होत्या मराठी ग्रंथात व कागदपत्रात या लोकांना हबशी,सिद्दी व सामल या संज्ञा दिल्या आहेत . बहमणी सत्तेच्या अस्तानंतर या सिद्दी लोकांनी अहमदनगरच्या निजामशाहीची चाकरी स्विकारली . दरबारातील सततच्या अंतर्गत कटकारस्थानापासून सिद्दींनी सत्ताकेंद्रापासून दूर कोकणसमुद्रकिनायावर आपली सत्ता मजवूत केली .



श्री सतेश बलभीम कदम

## संशोधनाची उद्दिष्टे ः

मराठे आणि सिद्दी यांच्यातील संबंधाचा अभ्यास करण्यासाठी पुढील उद्दिष्टे ठेवलेली आहेत .

- सिद्दींच्या राजकीय पार्श्वभूमीची माहिती करून घेणे .
- छ . शिवाजी महाराज आणि सिद्दी यांच्यातील संबंध समजून घेणे .

• छ . संभाजी महाराज व छ . शाहू महाराज यांच्या काळात सिद्दींची शक्ती कमी करण्यात मराठे कितपत यशस्वी झाले होते ते पाहणे .
• सिद्दींचा कायमचा बिमोड करण्यात मराठयांना आलेल्या अपयशाची कारणे शोधणे .

### 1 . सिद्दींची राजकीय पार्श्वभूमी ः

समुद्रकिनायावर इतर विदेशी व्यापायापासून व एतद्देशीयांच्या अवकृपेपासून सुरक्षित राहण्यासाठी सिद्दींना खाडीमध्ये मजबूत जलदुर्ग बांधण्याची गरज भासू लागली . दंडाराजपुरीच्या ठाणेदाराने बुहाण निजामशहाचा हुकुम मागवून इ . स . **1567** साली जंजियाचा कोट बांधण्याचे काम सुरू केले आणि इ . स . **1571** साली कोट पूर्ण बांधून त्यास किल्ले महरूप ऊर्फ जंजिरा हे नाव दिले . जंजिरा हीच सिद्दीची शेवटपर्यंत राजधानी राहिली,त्यांची ही सुरक्षित व अजिंक्य अशी राजधानी होती . सिद्दी लोक अर्थार्जनासाठी व्यापार कमी आणि चाचेगिरी मोठया प्रमाणावर करीत असत . त्यामुळे पोर्तुगीज व इंग्रजांबरोबर त्यांचे संघर्ष झाले . शेजारच्या मुलखावर वेळोवेळी स्वाया करून खंडणी गोळा करण्याच्या उपक्रमामुळे सिद्दींचे मराठयांबरोबर दीर्घकाळ संघर्ष झाले . सिद्दीजवळ चांगले आरमार होते . त्या आरमाराच्या जोरावर ते चाचेगिरी करीत असत . किनायाजवळ जाळपोळ,लुटालूट,धर्मातरण करणे,स्त्रीया व मुलांना पळविणे हया सारखे उद्योग ते करू लागले . 1मोगलांनी इ . स . 1637 साली निजामशाही नष्ट केली . त्यामुळे सिद्दी आदिलशहाच्या गोटात सामील झाले . आदिलशहानी सिद्दीला वजीर का किताब व दर्यासारंग हा हुद्दा देऊन शाहीआरमार त्याच्या हवाली केले . व्यापारी जहाजांना संरक्षण देणे आणि मक्केच्या दक्षिणी यात्रेकरूंची नेआण करणे ही कामे सिद्दीकडे सोपविण्यात आली .

### 2 . छ . शिवाजी महाराजांच्या काळातील मराठे आणि सिद्दी यांच्यातील संबंध ः

शिवाजी महाराजांनी इ . स . **1656** साली जावळीच्या मोयांची ठाणी काबीज केल्यानंतर कोकणपट्टी निर्धास्त करण्याचे ठरविले . सिद्दींच्या कोकणवासीयावरील अत्याचाराने कळस गाठला होता,त्यामुळे त्यांचा बंदोबस्त करणे शिवाजी महाराजांना महत्वाचे वाटले . मराठयांचा सिद्दीशी पहिला संघर्ष इ . स . **1657** साली सुरू झाला . या काळात जंजियाभोवतालच्या भागात सिद्दींनी अनन्वितअत्याचार केले होते . सभासदाने सिद्दीबद्दल म्हटले आहे की, 'घरात जसा उंदीर उपद्रव करीत असतो,तसा स्वराज्यात सिद्दीचा उपद्रव सुरू झाला . म्हणून शिवाजी राजांना आरमाराची गरज भासू लागली . ' **2**सिद्दीच्या विरोधातील या पहिल्या मोहिमेत मराठयांना अपयश आले . या अपयशाचे कारण या वेळचे शिवाजी महाराजांचे सैन्य पठारी मराठयांचे होते व आरमारी तयारीही बेताचीच होती . शिवाजी महाराजांनी सिद्दींच्या विरोधात इ . स . **1658** साली दुसरी मोहीम केली . या मोहिमेदरम्यान तळे,घोसाळे वगैरे किल्ले व त्याभोवतालचा प्रदेश मराठयांनी काबीज केला आणि जंजियाला वेढा घातला . मराठयांचा जोरदार मारा पाहून सिद्दी फत्तेखान एवढा घावरला, की शत्रुस किल्ला देवून जिवाचे रक्षण करावे अशी मसलत तो आपल्या सरदाराशी करू लागला . सिद्दी खैर्यतखान व सिद्दी कासीम यांनी त्याची निर्भत्सना केली व सांगितले की, 'आम्ही हवशी लोकांनी मोठी मेहनत घेऊन ही जागा संपादन केली आहे . तेव्हा ही जागा आपण होऊन शत्रुस देण्यापेक्षा मृत्यु बरा......... राज्य म्हटले की प्रथम जीवित्वाची आशा सोडावी लागते . ' **3**

दुसया दिवशी सिद्दी सरदार मोठया निकराने लढले आणि मराठयांना वेढा उठवावा लागला . शिवाजी महाराजांनी सिद्दींच्या विरोधात तिसरी स्वारी इ . स . **1659** साली मोठया तयारीने केली . व्यंकाजी दत्तो हा साहसी नेता,त्याच्यासोबत निवडक लढवय्ये ,मायनाक भंडारी व दर्यासारंग दौलतखान यांच्या हुकमतीतले नवीन आरमार अशी जय्यत तयारी करून जंजियाला चोहोबाजूनी वेढले . दौलतखानने जंजियाजवळ काशा खडकावर पद्मदुर्ग नावाचा किल्ला उभारला . जमिनीवरील युध्दात सिद्दीचा मोड झाला . त्यांचे आरमारही मराठयांनी हस्तगत केले . किल्लेदार फत्तेखान किल्यासह सर्व मुलुख मराठयांच्या स्वाधीन करून पळून जाण्यास तयार झाला . तेव्हा सिद्दी खैर्यतखानने त्यास कैद केले . सर्व बाजूंनी नाइलाज झाल्याने शिवाजीला दंडाराजापुरी देऊन सिद्दीला तह करावा लागला . विजयाची खात्री असूनही शिवाजी महाराजांना सिद्दीबरोबर तह करावा लागला,कारण शिवाजीमहाराजांचे पारिपत्यकरण्यासाठी विजापूरहून अफजलखान महाराष्ट्रात दाखल झाला होता . अफजलखानाचा निःपात करण्यासाठी सर्व शक्ती एकत्रीत करणे भाग झाल्यामुळे जंजियाच्या भोवतालची मराठी सेना वेढा उठवून जावळीच्या जंगलाकडे रवाना झाली . दुर्दैवाने जंजियाची ही मोहीम अपयशी झाली . **4**

सिद्दीच्या अवकृपेमुळे व अपकृत्यामुळे शिवाजी महाराजांचा त्याच्याबरोबरील संघर्ष चालूच राहिला . त्या संघर्षादरम्यान अनेक नररत्ने मराठेशाहीसाठी वीरत्व प्राप्त झाली . इतकेच नव्हे तर सिद्दीच्या शक्तीचे मर्म लक्षात आल्यामुळेच शिवाजी महाराजांनी किनायालगत अनेक जलदुर्ग उभारले आणि मराठयांचे पहिलेराष्ट्रीय आरमार सज्ज केले . शिवाजी महाराजांच्या राज्याचा पायाच कोकण व पश्चिम किनायावर होता . सुरतपासून कारवारपर्यंत सर्व प्रदेश आपल्या ताब्यात असावा,समुद्रावर आपले प्रभुत्व असावे व दर्यावर्दी व्यापारी आपला देश समृध्द व्हावा अशी त्यांची इच्छा होती . म्हणून त्यांनी अनेक जलदुर्गांची व आरमाराची उभारणी केली . इ . स . **1661** मध्ये जंजिरा काबीज झाला नाही म्हणून समुद्राच्या बाजूने शह देण्यासाठी शिवाजी महाराजांनी आपले आरमार उभारले . हवशांकडे जहाजे असल्यामुळे त्यांना समुद्रातून अन्नसामुग्री आणता येत असे . ती बंद करणे आवश्यक होते . त्यासाठी आरमार उभारणे हाच मार्ग होता . **5**

इ . स . **1664** साली मराठा आरमारात **85** गलबते आणि **3** महागिया होत्या . आरमार उभारणीसाठी शिवाजी महाराजांनी प्रथम पोर्तुगीजांची मदत घेतली,नंतर पोर्तु गीजांनी मदत नाकारल्याने शिवाजी महाराजांनी अनेक जहाज निर्मितीचे कारखाने उभारले . शिवाजी महाराजांनी मोठया आरमारानिशी सिद्दी विरूध्दच्या मोहिमेचा मुहुर्त इ . स . **1665** साली निश्चित केला . परंतु सिद्दीचे नशीब बलवत्तर . म्हणून की काय मिर्झाराजांच्या नेतृत्वाखाली याच वर्षी मोठी मोगल फौज दक्षिणेत दाखल झाली . इ . स . **1665** च्या पुरंदर तहात शिवाजी महाराजांनी जंजिरा किल्ल्याची मागणी केली . मिर्झाराजांनी ती मान्य केली . परंतु चाणाक्ष औरंगजेव बादशहाने ती मागणी अमान्य केली . जंजियाचे महत्व मैदानी जयसिंहाच्या ध्यानी आले नाही . मात्र औरंगजेवाला ते उमगले होते . जंजिरा ही कोकणची किल्ली ,ती हाती ठेवण्याचा फायदा पुढे औरंगजेवास मिळाला . **6**

आग्याहून परत आल्यानंतर शिवाजी महाराजांनी सिद्दीशी पुन्हा युध्द सुरू केले . इ . स . **1667** च्या मोहिमेत फत्तेखान इतका जेरीस आला की, त्याने शिवाजी महाराजांना जंजिरा खाली करण्याचे कबूल केले . परंतु इतर सिद्दी सरदारांनी फत्तेखानाला पदच्युत करून ठार केले आणि युध्द सुरू केले . शिवाजी महाराजांच्या जंजिरा मोहिमेचा मुख्यतः हेतू असून मनापासून जंजिरा काबीज करण्याचा हेतु होता . इ . स . **1657** पासून सिदीच्या बरोबर युध्द चालू होतेच . आणि हळूहळू त्यांच्या प्रदेशातील मुख्य भागापासून त्यांना हाकलले जात होते . नंतर पर्वतप्राय बेटावरील जंजिरा किल्याचा भयंकर संघर्ष सुरू झाला . शिवाजी महाराजांनी मुख्य भूमीवरून जंजियावर आघात करण्याचे आटोकाट प्रयत्न केला . बंदरासाठी एक धक्काही बांधला होता . तसेच त्यांनी कायमचे एक तरंगते आरमारही फिरते ठेवले होते . एकवेळ त्यांना यश मिळणार असे दिसले परंतु सिद्दींनी चिवट झुंज देऊन जंजियाला मराठयांच्या राज्यात सामील होण्यापासून वाचविले . शिवाजी महाराजांच्या आरमारामुळे सिद्दींची चाचेगिरी जवळ जवळ बंद पडली होती . यावर उपाय म्हणून सिद्दी खैरियतखानाने मोगलांचे स्वामित्व पत्करले आणि सिद्दी संबुलने मोगल आरमाराचे अधिपत्य स्विकारले . **7**

बादशहाने सिद्दी संबूल यास याकूबखान हा किताब व तीन लाखांची नेमणूक करून दिली . यामुळे जंजियाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा झाला . शिवाजी महाराज व सिद्दी दोघेही एकमेकांविरूध्द इंग्रजांकडे मदतीची मागणी करीत असत . परस्परांना नकळत इंग्रज त्यांना थोडीफार रसद व दारूगोळा पुरवीत असत . मोगलांशी इंग्रज द्रोह करू शकत नव्हते,कारण त्यांच्या प्रदेशात इंग्रजांच्या अनेक वखारी होत्या . शिवाजी महाराजांशी ते द्रोह करू शकत नव्हते,कारण त्यांचे इंधन व अन्नधान्य पुरवठा बंद होण्याची भिती होती . इंग्रजांनी जंजिरा मोहिमेसाठी शिवाजी महाराजांना मदत केली नाही . बलाढय मराठयाऐवजी कमकुवत सिद्दी त्यांना बरा वाटला . **8**

इ . स . **1671** साली होळीच्या रात्री सिद्दी खैर्यतखान यांनी दंडाराजपुरी येथील शिवाजी महाराजांच्या ठाण्यावर हल्ला चढविला आणि दारूगोळयाच्या कोठाराला आग लावली . याचवेळी सिद्दीने राजपुरी घेतली, पुरूषांची कत्तल केली आणि बायका मुलांना गुलाम केले . या कामगिरीबद्दल सिद्दीला मोगलांकडून शाब्बासकी मिळाली . इ . स . **1672**

साली सिद्दीने मराठी आरमारातील पन्नास मचवे बुडविले आणि जंजियाला वेढा घालून बसलेल्या मराठा सैन्यातील पंधरा हजार शिपायांची कत्तलकेली . उलटपक्षी इ . स . 1674 साली शिवाजी महाराजांनी सिद्दीचे शेकडो लोक कापून काढले आणि सिद्दीचे आरमार सुरतेपर्यंत पिटाळून लावले . इ . स . 1678 साली शिवाजी महाराजांनी खांदेरीस जलदुर्ग उभारला . इ . स . 1680 साली अलिबाग नजीक नवघर येथे जलदुर्ग उभारला आणि त्याला जंजिरे कुलावा असे नाव दिले . आरमारासाठी त्यांनी येथे गोदी व कारखाना उभारला . या तयारीमुळे इंग्रज व पोर्तुगीज इतके दचकले की ते म्हणत शिवाजी जन्मजात दर्यावर्दी नव्हता हे आमचे नशीब नाही तर आम्हासह दर्या साफ करून टाकला असता . 9

### 3 . छ . संभाजी महाराजांच्या काळातील मराठे आणि सिद्दी यांच्यातील संबंध :

शिवाजी महाराजांचा मृत्यु 3 एप्रिल 1980 रोजी झाला . त्यांच्या मृत्युनंतर संभाजीराजे छत्रपती झाले . औरंगजेबने इ . स . 1681 साली दक्षिण दिग्विजयाची मोहीम हाती घेतली . मराठयांचा निःपात करण्याच्या निर्धाराने तो दक्षिणेत आला होता . दक्षिणेत येताच औरंगजेबने सिद्दीला उठावण्याची प्रेरणा दिली . त्यावेळी मराठी राज्य मुख्यत्वे करून कोकणापुरते मर्यादित होते . महाराष्ट्राच्या बगलेवर सारखे हल्ले चढवीत राहणे सिद्दीलाच शक्य होते . सिद्दी हा मराठयांचा कट्टर दुष्मन होता . बादशहाचा पाठिंबा मिळताच सिद्दीने दांडगाई मांडली . मराठयांची गलबते गाठून ती जाळण्याचा सपाटा सुरू केला . इ . स . 1681 साली सिद्दीने पनवेलपासून चौलपर्यंतचा मुलुख उध्वस्त केला . सिद्दीचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी संभाजीने मराठीआरमार सज्ज केले व जंजियावर रवाना केले . सिद्दीबरोबर भयंकर संघर्ष केला . परंतु उत्तर कोकणात मोगल फौज उतरल्याने सिद्दीवरील मोहीम अर्धवट सोडावी लागली . या संघर्षात पोर्तुगीजांनी सिद्दीला मदत केली,त्याचे परिणाम त्यांना भोगावे लागले . परंतु इंग्रज यावेळी तटस्थ राहिले . सुरतकर इंग्रज मुंबईकरांना लिहितात,संभाजीराजा आणि सिद्दी यांच्याबाबतीत तुम्हाला त्रास होत असल्याबद्दल आम्हाला बाईट वाटते......... तुम्ही अतिशय गुंतागुंतीच्या बाबतीत अडकला आहात . त्यामुळे सिद्दीला बंदरात मदत करणे आणि संभाजीराजांचा रोष ओढवून घेणे या गोष्टी खया असल्या तरी ते दोघेही आपले मित्र आहेत . राजाच्या हितसंबंधांना विरोध होई ल . अशा तहेने सिद्दीला आमच्याकडून मिळणारा आश्रय व मदत राष्ट्राच्या कायद्याप्रमाणे समर्थनीय ठरणार नाही हे उघड आहे . पण जास्त वादग्रस्त जो ठरेल त्याची आपणाला निवड करावी लागेल . 10

### 4 . छ . शाहु महाराजांच्या काळातील मराठे आणि सिद्दी यांच्यातील संबंध :

दक्षिणेत औरंगजेबाचे पाऊल पडले तेव्हापासून शाहूच्या पुनरागमनापर्यंत महाराष्ट्रात अराजक माजले होते . परकीय दर्यावर्दी सत्तांच्या अस्तित्वामुळे या काळात कोकणपट्टीत अंदाधुंदीचा कळस झाला होता . या काळात पश्चिम किनायावर कान्होजी आंग्रेनी मराठयांचे नाव राखले . राजारामाच्या कारकिर्दीत सरखेलीवर नेमणूक झाली तेव्हापासून आयुष्याच्या अखेरीपर्यंत या आरमाराच्या जोरावर सुरतेपासून त्रावणकोरपर्यंत दर्यावर्दी उद्योग करणारांना कान्होजींचा दरारा जाणवला . हिंदुस्थानातील लढवय्या जमातीमध्ये मराठे बेबंद आणि दर्यावर्दी मराठयांमध्ये कान्होजी अग्रगण्य ! नजर ससाण्याची ,झेप गरूडाची आणि पकड मगरीची !घेरिया उर्फ विजयदुर्ग हे या गरूडाचे घरटे . 11

मुंबईनजिकच्या खांदेरी बेटावरील किल्ल्यावरून कान्होजीच्या आरमाराच्या हालचाली शिस्तीत सुरू झाल्या . तेव्हा इंग्रज बिचकले व सिद्दी हादरले . औरंगजेबाच्या मृत्युनंतर दिल्लीच्या बादशहाचा जोर ओसरला,त्यामुळे सिद्दीची सत्ता क्षीण झाली . औरंगजेबाने दक्षिणेतील मुसलमानी राज्ये बुडविली,त्यामुळे सिद्दीला उठावणीला चिथावणी किंवा मराठयांच्या पिछाडीवर त्याच्या हालचालींना साथ देणारी सत्ता राहिली नाही . यामुळे सिद्दीची कुचंबणा झाली . 12

कान्होजीच्या आरमारी सामर्थ्याची इतरांना आलेली प्रचीती पाहून सिद्दीची झोप उतरली होती . आंग्रे व सिद्दी हे शेजारी असल्यामुळे त्यांच्यात नेहमीच कुरकुरी/तंटे चालत . छत्रपती शाहूंनी बाळाजी विश्वनाथच्या मदतीने कान्होजीशी तह केला . या तहान्वये सिद्दींनी स्वराज्यातील बेबंदशाहीच्या काळात हडपलेला प्रदेशआंग्रे यांच्याकडे सनदशीरपणे दिला . त्यावर वर्चस्व मिळविण्यासाठी आंग्रे उत्सुक होते . कान्होजीने सिद्दीवर मोहीम काढली . तेव्हा कराराप्रमाणे बाळाजी विश्वनाथ मराठी सैन्यासह सरखेलाच्या मदतीला आला . पहिल्या सपाटयास सिद्दी नरम झाल्यामुळे बाळाजीने त्याचा कान्होजीशी सलोखा करून दिला (1716) . या अन्वये सिद्दीकडील 11 किल्ले मराठयांना परत मिळाले, सिद्दी नरम झाला पण नष्ट झाला नाही . 13

कुडाळच्या सावंतांना पोर्तुगीजांनी कान्होजी आंग्रेच्या विरोधात मदत देण्याचे मान्य केले . त्याचबरोबर सातारा दरबारातही कान्होजी विरूध्द कटकारस्थाने सुरू झाली होती . अशा स्थितीत कान्होजीनी प्रथम इंग्रजांशी तह केला . इ . स . 1725 च्या सुमारास जंजियाच्या सिद्दीबरोबर संघर्ष चालू ठेवला . हा लढा दीर्घकाळ चालू ठेवणे कान्होजीस परवडणारे नव्हते . सिद्दीबरोबर लढा देणे धोक्याचे आहे,हे कान्होजींनी ओळखले . त्यांनी सिद्दीला भरपूर द्रव्य देवून शांत केले . 14

जंजियाचा सिद्दी रसूल याचा मृत्यु इ . स . 1733 मध्ये झाला . त्याच्या मुलामध्ये गादीसाठी यादवी सुरू झाली . या संधीचा फायदा घेण्यासाठी छत्रपती शाहूंनी बाजीरावास सिद्दीच्या विरूध्द मोहिमेवर पाठविले . बाजीरावांनी ही मोहीम सेखोजी आंग्रेच्या नाविक बळावर यशस्वी होणार होती . परंतु 28 ऑगस्ट 1733 रोजी सेखोजीचा मृत्यु झाल्याने त्याच्या मुलांमध्ये यादवी सुरू झाली . त्यामुळे बाजीरावाने सिद्दीशी कसाबसा तह करून जंजियाच्या मोहिमेतून आपले अंग काढून घेतले . पुढे उदाजी पवारने इ . स . 1734 साली सिद्दीवर हल्ला चढविला . पाचाड येथील लढाईत सिद्दीचा पराभव झाला . या लढाईत सिद्दी अंबर अफवानी ठार झाला . सिद्दी सात कुलाब्याच्या आसपास लुटालूट करू लागल्यामुळे त्याच्या बंदोबस्तासाठी व आंग्र्याच्या मदतीसाठी शाहूनी चिमाजी आप्पास कोकणात पाठविले . रेवसजवळ कामारले येथे सिद्दीबरोबर मराठयांची निकराची लढाई झाली . त्यात मानाजीराव सुर्वे याने सिद्दी सात यास (1736)ठार केले . सिद्दी सात रावणासारखा दैत्य , तो मारून हवशांचा मूळ कंदच उपटून काढला ! या विजयाने मराठामंडळास अतिशय आनंद झाला . हवशांचे दोन प्रमुख सरदार पडल्यामुळे सिद्दी रहमान याने पेशव्यांशी तह केला . या तहान्वये सहा महाल मराठयांना मिळाले व सहा सिद्दीकडे राहिले . जंजिरा,गोवळकोट व अंजनवेल ही स्थळे हवश्यांच्याच हाती राहिली . 15

तुळाजी आंग्रेच्या ताब्यात विजयदुर्ग व इतर शेजारील प्रदेश होता . तुळाजीने इंग्रज वगैरे युरोपियनांवर जरब बसवून स्वराज्याची मोलाची सेवा केली . इंग्रजांचा व्यापार थंड पडला . तुळाजीची सत्ता, स्वाभिमान व वैभव पेशव्यांच्या डोळयात सलत होते . पेशवा एकटा तुळाजीचा पराभव करू शकत नव्हता, म्हणून त्याने इंग्रजांबरोबर तह केला . इंग्रजांना ही आयतीच चालून आलेली सुवर्णसंधी होती . पेशव्यांची सेना व इंग्रजी आरमाराने सुवर्णदुर्ग,विजयदुर्ग जिंकून त्यावर आपली निशाने फडकविली . पेशव्यांच्या लोकांना विजयदुर्गात येवू न देता किल्ल्यातील प्रचंड संपत्ती इंग्रजांनी हस्तगत केली . 250 तोफा,60 जहाजे,दारूगोळा व इतर धनद्रव्य इंग्रजांच्या ताब्यात गेले . पेशव्यांने इंग्रजास व्यापारी सवलती, काही मुलुख व इतर अटी मान्य केल्यानंतरच इंग्रजांनी विजयदुर्ग परत केला ..............इंग्रजांची मदत मिळवून स्वराज्याचे आरमार नष्ट करणारा स्वराज्य नाशक पेशवा बाळाजी बाजीराव . 16

### निष्कर्ष

शिवरायांनी महत्प्रयासाने सिद्दीला अद्यल घडविण्यासाठी उभारलेले आरमार कान्होजी,सेखोजी,तुळाजी यांनी विकसित करून सिद्दी,इंग्रज व पोर्तुगीजांवर दरारा निर्मा ण केला होता . मानपान व स्वार्थी हेतूने बाळाजी बाजीरावने इंग्रजांच्या मदतीने हे आरमार नष्ट केले . सिद्दीवरील वचक कमी झाला . त्याचे कोकणवासीयांवर पुन्हा अत्याचार सुरू झाले . सारांशरूपाने असे म्हणता येईल की सहयाद्रीच्या एका कातळाच्या आधारावर अढळ झालेल्या सिद्दीबरोबर मराठयांनी अनेक युध्दे केली,परंतु सिद्दीचा पूर्ण पराभव करणे त्यांना कधी जमले नाही . सिद्दीच्या आधारामुळेच मोगलांचा महाराष्ट्रात टिकाव लागला आणि मराठयांशी असलेल्या सिद्दीच्या शत्रुत्वामुळेच इंग्रज शक्ती वाढवू शकले . मराठयांच्या राज्यविस्तारामुळे पश्चिम किनायावरील सिद्दीचे वर्चस्व नष्ट झाले पण त्याचे घरटे मराठयांच्या हाती लागले नाही . मराठी सैन्य अटकेपासून कटकपर्यंत जवळजवळ

निष्कंटकपणे वावरत होते . परंतु महाराष्ट्राच्या कुशीत कुरूप करून राहिलेला विषारी काटा त्यांना उखडून काढता आला नाही .

## संदर्भ

1 . डॉ . विभा आठल्ये, प्राचीन व मध्ययुगीन भारत, अंशुल पब्लिकेशन्स , नोव्हेंबर 1999 पृ . क्र . 471
2 . कित्ता , पृ . क्र . 471
3 . सदाशिव आत्माराम जोगळेकर, सहयाद्री, शुभदा प्रकाशन , पुणे 1993, पृ . क्र . 374
4 . कित्ता , सहयाद्री, पृ . क्र . 375
5 . डॉ . भा . वा . आठवले, स्वामी दरियाचे ,राजहंस प्रकाशन , पुणे जुलै 1997, पृ . क्र . 06
6 . कित्ता , सहयाद्री, पृ . क्र . 377
7 . डॉ एस . एन . सेन,अनुवाद ः डॉ सदाशिव शिवदे,मराठयांची लष्करी व्यवस्था, डायमंड पब्लिकेशन ,2011 पृ . क्र . 40
8 . कित्ता , मराठयांची लष्करी व्यवस्था, पृ . क्र . 141
9 . कित्ता , सहयाद्री, पृ . क्र . 379
10 . फॅक्टरी रेकॉर्डस् ,सुरत,खंड 10,भाग 5
11 . कित्ता , सहयाद्री, पृ . क्र . 383
12 . कित्ता , सहयाद्री, पृ . क्र . 386
13 . कित्ता , सहयाद्री, पृ . क्र . 387
14 . कित्ता , मराठयांची लष्करी व्यवस्था, पृ . क्र . 160
15 . कित्ता , सहयाद्री, पृ . क्र . 395 96
16 . प्रा . मा . म . देशमुख, मध्ययुगीन भारताचा इतिहास, विश्वभारती प्रकाशन धनवटे चेंबर्स,सीताबर्डी, नागपूर,जाने 1998 पृ . क्र . 89

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org